# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

## अभिवेदन (Representation) क्रमांक ७९ / २०२६

### विहित मुदतीत नवीन वीज जोडणी न मिळाल्याबाबत

शिवाजी भिख् साखरे ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, (महावितरण) वाई ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ........... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थी :- सुरेखा साखर, सुन

प्रतिवादी :- १) विशाल शिवतरे, कार्यकारी अभियंता, वाई विभाग
२) सुरेंद्र भुटकर, उपकार्यकारी अभियंता, मेढा उपविभाग

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १८ ऑगष्ट २०२६

आदेश पारित दिनांक :- ८ सप्टेंबर २०२६

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, सातारा मंडळ (मंच) यांच्या दिनांक ३० जून २०२६ च्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २४ जलै २०२६ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक ३० जून २०२६ रोजीच्या आदेशान्वये पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

*१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०20 विद्युत अधिनियम २००३ (नियम ७.९ अ नुसार) सदर तक्रार कारवाईचे कारण उद्‌भवण्याच्या दिनांकापासून २ वर्षाच्या नंतर दाखल केली असल्याने (नियम ७.९ क अन्वये) सदर तक्रार फेटाळण्यात येत आहे.*

*२) महावितरण यांनी तक्रारदार यांचे वीज जोडणी आकारणी शुल्क रक्कम रु.७०४५/- आजच्या प्रचलित बँक व्याज दराने तक्रारदार यांना आजपासून ६० दिवसाच्या आत परत करावी. त्यासाठी तक्रारदार यांनी त्यांच्या बँक खात्याच्या तपशील महावितरणकडे आजपासून १५ दिवसाचे आत सादर करावा.*

२. मंचाने पारित केलेल्या आदेशाविरुध्द व्यथित होऊन, अपिलार्थीने हे अभिवेदन सादर केले आहे. सदर अभिवेदनाची दिनांक १८ ऑगष्ट २०२६ रोजी व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे ई-सुनावनी घेण्यात आली. ज्यामध्ये अपिलार्थी आणि प्रतिवादी उपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे सविस्तर ऐकुण घेण्यात आल. अपिलार्थीचे म्हणने आणि युक्तिवाद खालीलप्रमाणे आहेत. *[The Electricity Ombudsman's observations and comments are recorded under 'Notes' where needed.]*

- अपिलाथी शिवाजी भिखू साखरे हे राहणार आनेवाडी, तालूका जावळी, जिल्हा सातारा यांनी सन २००० मध्ये त्यांच्या मिळकतीतील गट क्र. ३२ तसेच गट क्र. ७०/१ व ७०/२ मध्ये नवीन कृषीपंप वीज जोडणी मिळण्याकरीता अर्ज केल होत. दोन्ही अर्ज महावितरणने कोणतीही हरकत न घेता मंजूर केले होते.
- गट क्र. ३२ मध्ये दिनांक ११ मार्च २००३ रोजी कृषीपंप वीज जोडणी देण्यात आली (ग्राहक क्रं.१९५०२१९७३०८०). त्याचा तपशील तक्ता क्र.१ मध्ये देण्यात आला आहे.

  तक्ता क्र.१

| Name | Address | Consumer No. | Tariff | Date of Connection | Sanction Load | Date of Application |
|---|---|---|---|---|---|---|
| Shivaji Bhiku Sakhare | At - Aanewadi, Tal.- Jaoli, Dist. -Satara | 195021973080 | Commercial | 11.03.2003 | 5 HP | Nov-2000 |

- परंतू गट क्र. ७०/१ व ७०/२ मधील कृषीपंप वीज जोडणीचा अर्ज आजतागायत म्हणजे जवळ जवळ २६ वर्ष प्रलंबित आहे सदर अर्ज आजपर्यंत ना नाकारण्यात आला आहे व रद्द करण्यात आला आहे. तसेच अर्जासोबत वीज जोडणीसाठी भरणा केलेले विहित रक्कम रु.९४७०/- दि.२२.११.२००० चा परतावाही करण्यात आलेला नाही. अपिलार्थीने याबाबत प्रतिवादी महावितरणकडे पत्रव्यवहार केलेल आहे. *[Note: The first recorded correspondence with the Respondent is dated 06.04.2026, which comes after a gap of 26 years.]*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- अपिलार्थीने सदर अर्जाचा वारंवार पाठपुरावा केलेला आहे. तसेच माहिती अधिकार २००५ अंर्तगत अर्ज करूनही सदर वीज जोडणी अर्जाची सद्य स्थितीबाबतची विचारणा केली आहे. अपिलार्थीची तक्रार ही केवळ विलंबाशी संबधित नसून नवीन वीज जोडणीचा अर्ज स्विकारून, विहित शूल्क स्विकारून वैधानिक लाभ सातत्याने नाकारला आहे. तसेच अपिलार्थीच्या नंतर आलेल्या अर्जदाराना वीज जोडणी देण्यासंबधी आहे. महावितरणला वीज जोडणी देण्यास होत असलेले विलंब हा प्रलंबित असलयामुळे सदर केस मुदतबाहय नाही. *[Note: The RTI application is on 30.04.2026 and its reply was on 26.05.2026.]*
- नवीन वीज जोडणीचा अर्जासह वीज जोडणीसाठी लागणाऱ्या विहीत शूल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीने सदर अर्जाचा पाठपुरावा करणे आवश्यक असल्याची नोंद वीज कायदा २००३, आयोगाची नियमावली किवा दिनांक १८ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयामध्ये तसेच दिनांक १५ जानेवारी २०२१ च्या महावितरणच्या परिपत्रकामध्ये नाही. अपिलार्थीचा वीज जोडणीचा परीपुर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीत वीज जोडणी देणे हे वितरण कंपनीची जबाबदारी आहे
- अपिलार्थीने माहिती अधिकारा अंर्तगतचे अर्ज तसेच विविध निवेदने, तसेच सततचा पाठपुरावा केलेला आहे, यांचा मंचाने योग्य विचार केलेला नाही त्यामुळे मंचाचा आदेश हा नैसर्गिक न्यायाच्या तत्वांशी, समानता, निष्पक्षता व मनमानीविरहीत प्रशासनाच्या तत्वांशी विसंगत आहे. वीज कायदा २००३, माननिय आयोगाची नियमावली किवा दिनांक १८ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयामध्ये तसेच दिनांक १५ जानेवारी २०२१ च्या महावितरणच्या परिपत्रकामध्ये पुर्वीपासून प्रलंबित असलेले अर्ज केवळ त्यांनंतर धोरणात बदल झाल्यामुळे अपात्र ठरतील अशी कोणतीही तरतूद नाही. दिनांक १८ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयाचा उद्देशच प्रलंबित पारंपारीक कृषी वीज जोडण्या देणे हा आहे. त्यामुळे सन २०१८ पुर्वीच्या वीज जोडण्याचा धोरणात्मक बदलाचा आधार घेऊन अपात्र ठरविणे हे अन्यायकारक व कायदेशीर दृष्टया असमर्थनीय आहे.
- अपिलार्थीने केलेल्या माहिती अधिकारा अंर्तगतचे अर्जान्वये मिळालेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने केलेल्या अर्जानंतर केलेल्या ग्राहकांना शिफारसीने कृषी वीज जोडणी देण्यात आली मात्र अपिलार्थीचा अर्ज प्रलंबित ठेवण्यात आला. त्यामुळे समान परिस्थितीत असलेल्या अर्जदारांना भिन्न वागणूक देण्यामागील कोणतेही वैध कारण, निकष वा कायदेशीर आधार प्रतिवादीने स्पष्ट केलेला नाही.
- अपिलार्थीने प्रस्तावित कृषी वीज जोडणीसाठी महावितरणकडून साहित्य पुरवण्यात आले होते यावरून सदर वीज जोडणी मंजूर झालेली असून वीज जोडणी देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती परंत पुर्ण करण्यात आली नाही. सदर साहित्य अजूनही अपिलार्थीकडे पडून आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

- मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून अपिलार्थीने माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालियामध्ये दिनांक २४ जलै २०२६ रोजी अभिवेदन दाखल केले व खालीलप्रमाणे मागण्या केल्या.
  - मंचाचा दिनांक ३० जून २०२६ चा आदेश रद्द करण्यात यावा.
  - दिनांक १८ डिसेंबर २०२० चा शासन निर्णय, दिनांक १५ जानेवारी २०२१ चे महावितरण परिपत्रक व अपिलार्थीची जेष्ठता विचारात घेऊन अपिलार्थीचे प्रलंबित वीज जोडणी देण्याचे निर्देश महावितरणला देणे. *[Note : During the hearing the Appellant stated that he was not willing for a solar connection as per the present policy. Hence his insistence on reviving the older application for a 'traditional' connection]*
  - कृषी विहीरीचे नुकसान व पडझड, आर्थिक अडचणी, भुजलस्तोत्रांचे नुकसान, सिंचन सुविधेचा अभाव, मानसिक त्रास व न्यायालयीन खर्च तसेच २६ वर्ष वीज जोडणी अभावी शेतीचे नुकसान झाल्यामुळे अंदाजे रु.१,५०,०००/- प्रतिवर्ष (एकुण मागणी रु.१४,३५,००००/-) इतके कृषी उत्पन्नाचे नुकसान भरपाई देण्यात यावी.

३. प्रतिवादी महावितरणने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १८ ऑगष्ट २०२६ रोजी सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी शिवाजी भिख साखरे हे राहणार गट क्रं. ३२, आनेवाडी, तालूका जावळी, जिल्हा सातारा येथील कृषी ग्राहक (ग्राहक क्रं.१९५०२१९७३०८०) दिनांक ११ मार्च २००३ पासून आहेत.
- अपिलार्थीने यांनी सन २००० मध्ये त्यांच्या मिळकतीतील गट क्र. ३२ मध्ये नवीन कृषीपंप वीज जोडणी मिळण्याकरीता अर्ज केला होता. दिनांक ११ मार्च २००३ रोजी कृषीपंप वीज जोडणी देण्यात आली (ग्राहक क्रं.१९५०२१९७३०८०).
- तसेच गट क्र. ७०/१ व ७०/२ मध्ये अपिलार्थी प्रमाणे नवीन कृषीपंप वीज जोडणी मिळण्याकरीता अर्ज केला होता. **परंतू गट क्र. ७०/१ व ७०/२ मधील कृषीपंप वीज जोडणीचा अर्जाची नोंद कोठेही नस्ती मध्ये नाही तसेच त्यावेळी अपिलार्थी म्हण्यानुसार कथित भरुन घेतलेले रु.९४७०/- या बाबत कोठेही या कार्यालियात नोंद नाही.**
- अपिलार्थीची तक्रार ही नोव्हेंबर २००० मध्ये पारंपारीक कृषी वीज जोडणीसाठी अर्ज करण्याशी संबधित आहे. ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२० मधील ७.८ व ७.९ मधील तरतुदीनुसार अपिलार्थीची तक्रार ही कारवाईचे कारण घडल्यापासून दोन वर्षाच्या आत दाखल करणे बंधनकारक आहे. सदर कारवाई सन २००० मध्ये किंवा त्यानंतर लगेचच उदभवले आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

परंतू मंचाकडे सन २०२६ मध्ये दाखल करण्यात आली म्हणजे सुमारे २६ वर्षानेे दाखल करण्यात आली असल्याने सदर तक्रार मुदतबाह्य आहे. त्यामुळे मंचाने तक्रार फेटाळली हे योग्य आहे. *[Note: The Electricity Act, 2003 came in force on 26.05.2003 and subsequently this Grievance Redressal Mechanism came into being in December 2004.]*

- अपिलार्थीने सन २००० मध्ये केलेल्या दाव्याला आजच्या घडोला कोणतीही अट, तांत्रिक व्यवहार्यता अथवा प्रस्तावित नियम न तपासता वीज जोडणी मिळण्याचा कायमस्वरूपी हक्क प्राप्त होत नाही. अपिलार्थीने सन २००० मध्ये केलेला अर्ज आजतागायत वैध व प्रलंबित होता व वीज जोडणीसाठी आवश्यक अटी त्यांनी पुर्ण केला, हे कागदपत्रांद्वारे सिध्द होत नसल्याने अपिलार्थी यांचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.
- महावितरणने गेल्या काही वर्षात राज्याच्या उर्जा धोरण व कार्यप्रणालीमध्ये मोठे बदल केलेले आहेत. तसेच शासकीय धोरणांची अंमलबजावणी करताना कृषी वीज जोडणी देण्याच्या पध्दतीत मोठे बदल केलेले आहेत. सन २००० च्या जुन्या व प्रलंबित प्रकरणासाठी पारंपारीक उपरी वाहिणी विस्तारीकरण करणे तांत्रिक दृष्टया शक्य नाही. **महावितरणच्या सध्याच्या शासकिय धोरणाविरूध्द व तांत्रिक चौकटीबाहेर जाऊन पारंपारीक पध्दतीने कृषीपंपाला वीज जोडणी शक्य नाही.** दिनांक २४ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार कृषी वीज जोडणीची प्रकरणे सद्या महावितरणच्या सौर कृषी वीजपंप योजनेअंर्तगत देण्यात येत आहेत. **अपिलार्थीने या योजनेच्या सर्व अटीची पुर्तता केल्यास सौर कृषीपंपाद्वारे वीज जोडणी देण्यास महावितरण तयार आहे. तसे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. परंतू अपिलार्थीने त्यास संमती दर्शविली नाही.**
- अपिलार्थीने दिनांक १८ डिसेंबर २०२० चा शासन निर्णयाच्या अनुषंगाने महावितरणने दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाचा आधार घेतला आहे. दिनांक ४ जानेवारी २०२० मधील प्रत्येक कथीत अर्जदारास कोणत्याही पुढील अटींची पुर्तता न करता वीज जोडणी देणे महावितरणला बंधनकारक आहे असा अर्थ अपिलार्थीने काढलेला आहे जो चुकीचा आहे. सदर धोरणाचा लाभ घेण्यासाठी संबधित अर्जाची वास्तविक स्थिती पात्रता, वरिष्ठता, तांत्रिक व्यवहार्यता याची चालू अटीची पुर्तत तपासणे आवश्यक आहे. अपिलार्थीने सन २००० मध्ये दोन कृषीपंप वीज जोडणी अर्ज केले होते, त्यापैकी एक वीज जोडणी ग्राहक क्रं.१९५०२१९७३०८० हे दिनांक ११ मार्च २००३ रोजी देण्यात आलेले आहे. परंतू दुसऱ्या कृषीपंप वीज जोडणी अर्जाची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, **सन २०१३ पासून कृषीपंप वीज जोडणी ऑनलाईन पध्दतीने रेकॉर्ड करण्यात आलेले आहे. त्यामध्ये महावितरणकडे उपलब्ध असलेल्या यादीत अपिलार्थीचे नाव आढळून येत नाही. तसेच कार्यालयीन रेकॉर्डची पडताळणी केली असता**

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

**सन २००० पासून अपिलार्थीने आजपर्यंत कृषीपंप वीज जोडणी संदर्भात कोणताही अर्ज, तक्रार, पत्रव्यवहार अथवा पाठपुरावा केला असल्याचे नोंद उपलब्ध नाही. जी वीज जोडणी दिली गेली नाही त्याच्या पावतीची नोंद ऑनलाईन प्रणालीमध्ये नाही. त्यावेळी सदर अर्ज करण्यात आला की नाही, व असल्यास सदर वीज जोडणी का झाली नाही याबाबत आता २६ वर्षानंतर सांगणे शक्य नाही.**

- परंतू महाराष्ट्र शासनाने कृषी धोरण २०२० (एचव्हीडीएस) अंतर्गत केवळ **ऑक्टोबर २०२१ पर्यंत ज्यांनी कोटेशन / डिमांड नोट भरलेली आहेत; अशा कृषी पंप वीज जोडणीसाठीच निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यानंतर शासनाने कृषी धोरण २०२० (एचव्हीडीएस) योजनेसाठी निधी देणे थांबविल्यामुळे ऑक्टोबर २०२१ नंतर एचव्हीडीएस योजने अंतर्गत कोणत्याही कृषीपंप ग्राहकासाठी निधी प्राप्त झाला नाही.**
- महाराष्ट्र शासनाने सौरऊर्जा आधारीत कृषीपंपाद्वारे वीज पुरवठा करण्यासाठी (पीएम-कुसुम-बी) "तसेच मागेल त्याला सौर कृषीपंप" ही योजना अंमलात आणलेली आहे. तसेच, **दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पूर्ण रक्कम भरूनही प्रलंबित असलेल्या अर्जदार शेतकऱ्यांना त्यांनी भरलेली रक्कम परत करण्याचे व त्यांना सौर पंपासाठी अर्ज करण्याबाबत कळविण्याचे निर्देश देण्यात आले.** त्यानुसार प्रलंबित असलेल्या पारंपारिक कृषीपंप अर्जाचे रूपांतर सौरपंप अर्जात करण्याचे आदेश दिले ते खालीलप्रमाणे.

*"Minutes of Meeting of Ces/RDs Review Meeting dated 17.10.2024:-*

*…….*

*11. 88,914 Conventional Ag paid pending connections should be converted into off-grid solar pumps by approaching the consumers. Physical verification of these consumers should be carried out for unauthorised use, if any. Sanction of Ag pumps under 1.3% DDF scheme should be disallowed in the IT System, CGRF orders, if any for issuing conventional pumps shall be challenged in High Court citing guidelines issued by GSDA in terms of ground water level."*

*…………….*

- अपिलार्थीने पीक नुकसान व विहिरीच्या नुकसाणीपोटी केलेली रू.१४,३५,०००/- ची मागणी पुर्णपणे निराधार आहे. महावितरणच्या सेवात्रुटीमुळे नाही तर अपिलार्थीच्या स्वतःच्या निष्काळजीपणामुळे जमीन पडीक राहील्याने अपिलार्थीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे अपिलार्थीची नुकसान भरपाईची मागणी फेटाळण्यात यावी. प्रतिवादीने सदर अभिवेदन अपिल खर्चासह

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

फेटाळण्यात यावे व इतर न्यायाचे हुकूम प्रतिवादी यांच्या वतीने देण्यात यावे अशी मागणी केली आहे.

**विश्लेषण व निर्णय**

४. पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

५. अपिलार्थीने गट क्र. ३२ मध्ये व गट क्र. ७०/१ व ७०/२ मध्ये नवीन कृषीपंप वीज जोडणी मिळण्याकरीता अर्ज केला. अर्जासोबत विहित शुल्क भरले असून, त्यानंतर वेळोवेळी पाठपुरावा तसेच माहिती अधिकाराअंतर्गत अर्ज व विहीत निवेदन २०२६ रोजी सादर केली. तथापि अद्याप पारंपारीक पध्दतीने वीज जोडणी देण्यात आलेली नाही. अपिलार्थीचा अर्ज केवळ विलंबाशी संबधित नसून, विहीत शुल्क प्राप्त झाल्यानंतरही वीज जोडणी न दिल्यामुळे निर्माण झालेल्या सततच्या त्रासाशी संबधित आहे. अपिलार्थीने वारंवार पाठपुरावा करणे आवश्यक असल्याची कोणतीही तरतूद वीज कायदा २००३, माननीय आयोगाच्या नियमावलीमध्ये वा शासन निर्णय किंवा महावितरणच्या परिपत्रकामध्ये नाही. सन २०१८ पुर्वीच्या अर्जासि नंतरच्या धोरणाच्या आधार अपात्र ठरविणे हे अन्यायकारक व कायदेशीर्दृष्टया असमर्थनीय आहे. माहिती अधिकार अर्जामधून प्राप्त झालेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीनंतर केलेलया अर्जधारकांना अपिलार्थीच्या अगोदर वरीष्ठ वीज जोडणी यादीचा विचार न करता वीज जोडणी देण्यात आलयाचे निदर्शनास येते. त्यामुळे माननीय विद्युत लोकपाल यांच्याकडे अभिवेदन सादर करून, मंचाचे आदेश रद्द करण्यात येऊन अपिलार्थीस पारंपारीक पध्दतीने वीज जोडणी देण्याचे निर्देश महावितरणला देण्यात यावे. तसेच कृषी वीज जोडणी अभावी अपिलार्थीस अंदाजे रु.१,५०,०००/- प्रतिवर्ष प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी.

६. अपिलार्थी शिवाजी भिखू साखरे हे आनेवाडी, तालूका जावळी, जिल्हा सातारा येथील कृषी ग्राहक आहेत. अपिलार्थीने यांनी सन २००० मध्ये त्यांच्या मिळकतीतील अपिलार्थीने गट क्र. ३२ मध्ये व गट क्र. ७०/१ व ७०/२ मध्ये नवीन कृषीपंप वीज जोडणी मिळण्याकरीता दोन अर्ज केले. त्यामधील गट क्र.३२ मध्ये दिनांक ११ मार्च २००३ रोजी कृषीपंप वीज जोडणी देण्यात आली (ग्राहक क्रं.१९५०२१९७३०८०). गट क्र. ७०/१ व ७०/२ बाबत स्वतंत्र अर्जाची अथवा आवश्यक पाठपुराव्याची कार्यालयीन नोंद उपलब्ध नाही. सन २००० पासून आजपर्यंत अपिलार्थीने संबधित वीज जोडणीसाठी अर्ज, तक्रार किंवा पत्रव्यवहार केल्याचेही अभिलेखात आढळत नाही. कदाचित Right of Way संबधी काही वाद-विवाद असल्यामुळे अथवा अपिलार्थीची वीज जोडणी घेण्यास स्वारस्थ दाखविले नसेल त्यामुळे अर्ज निकाली काढला असल्याबाबत सध्य स्थितीत कार्यालयीन माहिती उपलब्ध नाही. सदर तक्रार सन २००० मधील कारणाशी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

संबधित असून ती सन २००६ मध्ये दाखल झाल्याने ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२० मधील तरतुदीनुसार मुदतबाह्य आहे. त्यामुळे मंचाने सदर तक्रार फेटाळणे योग्य आहे.

सन २००० च्या जुन्या अर्जाच्या आधारे आजच्या परिस्थितीत पारंपारीक पध्दतीने कृषी वीज जोडणी देण्याचा कायमस्वरूपी हक्क निर्माण होत नाही. दरम्यान शासनाच्या धोरणानुसार कृषी वीज जोडणीचया पध्दतीत बदल झाला असून प्रलंबित कृषी वीज जोडण्यासाठी सौर कृषी वीज पंप योजना लागू करण्यात आली आहे. शासनाच्या निर्देशानुसार प्रलंबित पारंपारीक कृषी वीज जोडणी अर्जाचे सौर कृषी पंप अर्जात रूपांतर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. अपिलार्थीने या योजनेच्या सर्व अटीची पुर्तता केल्यास सौर कृषीपंपाद्वारे वीज जोडणी देण्यास महावितरण तयार आहे. शासकीय धोरणांची अंमलबजावणी करताना कृषी वीज जोडणी देण्याच्या पध्दतीत मोठे बदल केलेले आहेत. सन २००० च्या जुन्या व प्रलंबित प्रकरणासाठी पारंपारीक उपरी वाहिणी विस्तारीकरण करणे तांत्रिक दृष्टया शक्य नाही. अपिलार्थीने पीक नुकसान व विहिरीच्या नुकसाणीपोटी केलेली रू.१४,३५,०००/- ची मागणी ठोस पुराव्याअभावी पुर्णपणे निराधार आहे. सदर नुकसान महावितरणच्या सेवात्रुटीमुळे झालेले नाही. त्यामुळे अपिलार्थीची नुकसानभरपाईची मागणी योग्य नाही.

७. महाराष्ट्र शासनाने कृषी धोरण २०२० (एचव्हीडीएस) उच्च दाब वीज वितरण प्रणाली अंर्तगत केवळ ऑक्टोबर २०२१ पर्यंत ज्यांनी कोटेशन / डिमांड नोट भरलेली आहेत अशा कृषी पंप वीज जोडणीसाठीच निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यानंतर शासनाने कृषी धोरण २०२० (एचव्हीडीएस) योजनेसाठी निधी देणे थांबविल्यामुळे ऑक्टोबर २०२१ नंतर एचव्हीडीएस योजने अंर्तगत कोणत्याही कृषीपंप ग्राहकासाठी निधी प्राप्त झाला नाही.

८. शासनाने ऑक्टोबर २०२१ नंतर एचव्हीडीएस (उच्च दाब वीज वितरण प्रणाली) योजने अंर्तगत कोणत्याही कृषीपंप ग्राहकासाठी निधी देणे थांबविले. तसेच शासनाने सौर ऊर्जा आधारीत कृषीपंपाद्वारे वीज पुरवठा करण्यासाठी "मागेल त्याला सौर कृषीपंप" ही योजना अंमलात आणलेली आहे. त्यानुसार प्रलंबित असलेल्या पारंपारिक कृषीपंप अर्जाचे रूपांतर सौरपंप अर्जात करण्याचे आदेश दिले.

*"मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना, टप्पा २ व ३ महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक ११ सप्टेंबर २०१९ चा शासन निर्णय क्रमांक : सौरप्र-२०१९/प्र.क्र.१५९/ऊर्जा-७ मधील प्रस्तावना खालीलप्रमाणे.*

***प्रस्तावनाः-***

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

राज्यात अटल सौर कृषीपंप योजना राबविन्यासंदर्भात घेतलेल्या निर्णयासमवेत राज्य शासनाद्वारे राज्यात १ लक्ष सौर कृषीपंप आस्थापित करण्यासाठी विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतूद व अनुसूचित जाती / जमाती लाभार्थ्यांकरीता विशेष घटक योजना / आदिवासी उपयोजनांर्तगत निधीचा वापर करून नवीन सौर कृषीपंप योजना तयार करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे व राज्य शासनाची पारंपारिक पध्दतीने कृषीपंप जोडणीसाठी लागणाऱ्या खर्चाच्या बचतीचे / अनुदान व क्रॉस सबसिडी मधील बचतीचे उदिष्ट साध्य व्हावे, याकरीता राज्यातील शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी पारेषण १ लक्ष सौर कृषीपंप तीन टप्पयात उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास दि. १६ ऑक्टोबर २०१८ च्या मंत्रीमंडळ बैठकीत मंत्रीमंडळाने मान्यता दिली. त्यानुसार दि. १५ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यात "मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना" लागू करण्यात आली.

५. लाभार्थी निवडीचे निकषः-

१) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्या शेतकऱ्यांकडे शाश्वत जलस्तोत्र उपलब्ध आहे, असे सर्व शेतकरी पात्र राहतील. मात्र अशा शेतकऱ्यांकडे पारंपारिक पध्दतीने विद्युत जोडणी झालेली नसणे आवश्यक आहे.

२) ५ एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास ३ अशवशक्ती क्षमते पर्यंतचे सौर कृषी पंप व ५ एकरापेक्षा जास्त शेतजमीन धारक शेतकऱ्यास ५ अशवशक्ती क्षमतेचा सौर कृषी पंप देय राहील. ५ एकर क्षेत्रापेक्षा जास्त शेतजमीन धारण करणाऱ्या लाभार्थ्यांस भौगोलिक परिस्थितीनुसार पंपासाठीची मागणी विचारात घेऊन ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषी पंप देय राहील.

३) राज्यातील पांरपारीक उर्जेद्वारे विद्युतीकरण न झालेले शेतकरी विद्युतीकरणासाठी वन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसलेले शेतकरी, महावितरण कंपनीकडे विद्युत जोडणीसाठी पैसे भरूनही प्रलंबित असणाऱ्या ग्राहकांपैकी / शेतकऱ्यांपैकी, ज्यांना नजीकच्या काळात विद्युत जोडणी मिळणे शक्य नाही असे शेतकरी, अतिदुर्गम भागातील शेतकरी, महाराष्ट्र शासनाच्या धडक सिंचन योजने अंर्तगत लाभ घेतलेले शेतकरी यांना सदर योजने अंर्तगत प्राधान्य राहील.

४) वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळे, विहिर, बोअरवेल, बारमाही वाहणारी नदी / नाले यांच्या शेतातील शेतजमीनधारक शेतकरी सुध्दा या योजनेसाठी पात्र राहतील.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

५)	शेतकऱ्याकडील बोअरवेल, विहीर व नदी इ. ठिकाणी शाश्वत पाण्याचा स्तोत्र उपलब्ध आहे, याची खात्री महावितरण कंपनीद्वारा निश्चित केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

६)	सदर योजनेंतर्गत सौर कृषी पंप संच किमतीच्या सर्वसाधारण गटाच्या लाभार्थ्याने १० टक्के व अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्याने ५ टक्के लाभार्थी हिस्सा म्हणून भरणे आवश्यक राहील."

"मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना, महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक १ जानेवारी २०१९ चा शासन निर्णय क्रमांक : सौरप्र-२०१८/प्र.क्र.४०१८/ऊर्जा-७ मधील प्रस्तावना खालीलप्रमाणे.

प्रस्तावनाः-

शेतकऱ्याला सिंचन करणे शक्य व्हावे व राज्य शासनाची पारंपारीक पध्दतीने कृषीपंप जोडणीसाठी लागणाऱ्या खर्चाच्या बचतीचे उद्दिष्ट साध्य व्हावे याकरीता राज्यातील कृषी वापरासाठी पारेषण विरहीत १ लाख सौर कृषीपंप टप्प्याटप्प्यात उपलब्ध करून देण्याकरीता राज्यात मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयानुसार सुरु करण्यात आली आहे.

०२	सदर योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी महावितरण कंपनीवर टाकण्यात आली असून, योजना यशस्वीरित्या राबविण्याच्या दृष्टीने व सौरपंप घेण्यासाठी अर्जदारांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने त्यात बदल करण्याची विनंती विभागास संदर्भ क्र.२ येथील पत्राद्वारे प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णयात काही बदल करण्याची बाब विचाराधीन होती. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयात पुढील बदल करण्यात येत आहे.

शासन निर्णयः-

१).......

२)......

३)......

४)	योजनेची अंमलबजावणी करतांना लाभार्थ्याकडे शाश्वत पाण्याचा स्त्रोत उपलब्ध करण्याची जबाबदारी महावितरणद्वारा निश्चित केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून खात्री करून घेण्यात यावी. योजनेच्या अमंलबजावणीकरीता निर्माण करण्यात आलेल्या

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

*जिल्हास्तरीय समितीबाबत असा निर्णय घेण्यात आला आहे की, सदर योजनेत लाभार्थी निवडीची प्रक्रिया कमी अवधीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय समिती रद्द करून लाभार्थ्यांची निवड करण्याकरीता महावितरणद्वारा ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात येईल, ज्यामध्ये अर्जदाराला विहित नमुन्यातील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा असेल. अर्जदाराचे स्थळ परिक्षण महावितरणद्वारा करण्यात येऊन लाभार्थी निवडीच्या निकषानुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.*

*५) महावितरणकडे असणाऱ्या LMC निधीतून सदर योजनेची प्रसिध्दी व समन्वय साधण्यासाठी येणारा प्रशासकीय खर्च म्हणून रु.८ कोटीपर्यंत वापरण्यात यावा. या निधीच्या मार्गदर्शक तत्वात बदल आवश्यक असल्यास तसा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.*

*६) योजनेच्या संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील मुद्दा क्र.११(९) मधील सौर कृषी पंपासाठी पुरवठादाराकडून पाच वर्षासाठीचा सर्वकष देखभाल व दुरूस्ती करार नोंदणीकृत करण्याची सक्ती करण्यात येऊ नये. हमी कालावधीत पुरवठादाराची सुरक्षा अनामत / बँक गॅरंटी महावितरणकडे असल्याने, प्रत्येक सेवा पुरविली नाही तर ती रक्कम अशा रक्कमेतून वसूल करण्यात यावी. तसेच प्रत्येक जिल्हयात दुरूस्ती केंद्र उभारणे व तक्रार नोंदणीसाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्याची अट टाकण्यात यावी."*

९. वरील सर्व बाबींचा उहापोह करता तसेच "मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना" विचारात घेता अपिलार्थीना पारंपारिक पध्दतीने वीज जोडणी देणे शक्य नाही. कारण महावितरणने महाराष्ट्र शासनाशी विचार विनिमय करून पारंपारिक वीज जोडणी देण्याचे वेब सर्व्हिस पोर्टल देखील बंद केले आहे. सबब, अपिलार्थीना सौर कृषीपंप योजने द्वारेच वीज जोडणी घेणे गरजेचे आहे. सदर तक्रारीचा कालावधी हा सन २००० मधील असुन वीज कायदा २००३ हा सन २००३ मध्ये अस्तित्वात आला. सदरचे अभिवेदन हे म्हणजे सुमारे २६ वर्षानि दाखल करण्यात आली असल्याने सदर तक्रार मुदतबाह्य आहे.

१०. मंचाचे आदेश योग्य आहेत. त्यावर काही बदल करण्याची गरज नाही.

११. अपिलार्थीचे अभिवेदन नामंजूर करण्यात येत आहे व निकाली काढण्यात येत आहे.

सही/
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.